MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात

केज मतदार संघामध्ये दोन ते तीन हजार कोटी रुपयांचा निधी आणल्याची चर्चा सध्या गुत्तेदारांमध्ये आहे परंतु त्याच गुत्तेदार आता नंदू शेठ साठी सरसावले असून नंदू शेठ मुंदडा म्हणजेच स्वर्गीय विमलताई मुंदडा यांचे पती विद्यमान आमदार नमिता ताई मुंदडा यांचे सासरे हे आता गुत्तेदारांना पोसणारे मुंदडा परिवार आहे या मुंदडा परिवारामध्ये फक्त गुत्तेदार कार्यकर्ते म्हणून मिळवत आहेत तर खरे सच्चे कार्यकर्ते हे बाजूला गेलेले आहेत दलित मुस्लिम आणि मराठा या लोकांच्या विरोधामध्ये असलेल्या नंदकिशोर मुंदडा व मुंदडा परिवाराला आमदार नमिता मुंदडा यांना घरी बसवल्याशिवाय राहणार नाहीत गेल्या दोन ते तीन हजार कोटी रुपयाचा निधी आणल्याचा गवगवा केला जात आहे. परंतु हा निधी कुठे खर्च केला व कोणत्या गुत्तेदाराला दिला त्या गुत्तेदाराकडून टक्केवारीचा खेळ झाला का नाही झाला हे तपासणी गरजेचे आहे. त्यामुळे निष्ठावंत कार्यकर्ते बाजूला गेले आहेत. नंदकिशोर मुंदडा यांच्याजवळ आता फक्त आणि फक्त गुत्तेदार शिल्लक राहिलेला आहे. त्यांच्याजवळ कार्यकर्ते कमी आणि गुत्तेदार जास्त असल्यामुळे केज मतदार संघामध्ये आता त्यांचा पराभव आपण मानला जात आहे.

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष –०२ अंक –५२ शुक्रवार दि.०८ नोव्हेंबर २०२४ आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू


## राखीव जागा असतांना देखील बाकी कार्यकर्त्यांनी केवळ सतरंज्याच उचलायच्या का?

# नंदू सबका बंधू!

## नंदू काका नव्हे नंदू दाजी म्हणा केज मतदार संघात आता नवीन चर्चेला उदान?

## आ. नमिता मुंदडाना पाडून केज मतदार संघातील मागासवर्गीय समाज परतफेड करणार?

**अंबाजोगाई /प्रतिनिधी– महाराष्ट्रामध्ये होऊन घातलेल्या २०२४ च्या निवडणुकीमध्ये सध्या मराठा ओबीसी आरक्षणामुळे वादाच्या भौऱ्यामध्ये सापडलेले लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीमध्ये आता मागासवर्गीय समाजासाठी आरक्षित असलेल्या जागेवर सुद्धा आता खूप मोठी रसिकेत झालेली आहे. मनोज दादा जरांगे पाटलाच्या आंदोलनामुळे मराठा समाज एकवटला आहे याचा फटका मराठा आरक्षण संदर्भामध्ये विरोधामध्ये असलेल्या नेत्यांनाही पाहायला मिळत आहे. याचाच एक भाग म्हणजे केज मतदार संघात नंदकिशोर मुंदडा यांच्या आडमुठ्या भूमिकेमुळे आता केज मतदार संघात सुनबाई नमिताताई ताई मुंदडा यांचा पराभव आढळ मानला जात आहे.**

केज अंबाजोगाई मतदार संघ हा एस सी प्रवर्गातून राखीव असल्यामुळे त्या ठिकाणी मागासवर्गीय समाजाचा आमदार व्हावा म्हणून अनेक मागासवर्गीय समाजातील जाती धर्माचे नेते आपले वर्चस्वपनाला लावून त्या ठिकाणी निवडणूक लढवत आहेत. याचाच एक भाग म्हणून केज मतदार संघाच्या विद्यमान आमदार नमिता ताई मुंदडा ह्या एस सी चांभार या जातीतून आपला उमेदवारी अर्ज दाखल करत आहेत. तर त्या दुसर्यादा निवडणूक लढवून विधानसभेमध्ये जाण्याची स्वप्न पाहत आहेत. परंतु त्यांचे सासरे हे मारवाडी समाजाचे असल्यामुळे मुंदडा परिवार हा नेहमीच दलित एससी च्या जागेवरती आपली राजकीय पोळी भाजून स्वतःचा फायदा करून घेत आहेत. नंदकिशोर मुंदडा त्याच्या पत्नी स्व.विमलताई मुंदडाच्या नावावर अगोदर मतदान मागायचे तर आता ते सुनबाई नमिताताई मुंदडा यांच्या नावावरती मागासवर्गीय असल्यामुळे त्यांना त्या जागेवरती उभा करून त्या ठिकाणी निवडणूक लढवत आपली राजकीय अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न करत आहेत परंतु आता केज मतदार संघातील जनता ही जागी झालेली आहे त्यामुळे मुदडा परिवाराला आता बाजूला करून नवीन चेहऱ्याला संधी देण्याच्या तयारीत केज मतदार संघातील जनता आहे

केज मतदार संघामध्ये गेल्या अनेक वर्षापासून एससी राखीव मतदार संघ असल्यामुळे त्या ठिकाणी एस सी मागासवर्गीय समाजाचा मांग, महार,चांभार या जातीत सह अन्य मागासवर्गीय समाजातील पोट जातीचा उमेदवार उभा राहणे गरजेचे आहे परंतु नंदकिशोर मुंदडा यांनी स्वर्गीय विमलताई मुंदडा यांच्यासोबत आंतरजातीय विवाह केला त्यानंतर त्यांचे सुपुत्र अक्षय मुंदडा यांनीही नमिताताई मुंदडा यांच्यासोबत आंतरजातीय विवाह केला व राजकीय तडजोडीमध्ये मागासवर्गीयांच्या एससी चा फायदा घेऊन स्वतःचे राजकीय अस्तित्व टिकवत आहेत. त्यामुळे आता नंदकिशोर मुंदडा यांना आता नंदू काका ऐवजी नंदू दाजी मन्हावं म्हणून आता केज अंबाजोगाई मतदारसंघांमध्ये चर्चा रंगू लागले आहेत नंदकिशोर मुंदडा हे पहिल्यांदा स्वतःच्या पत्नी स्वर्गीय विमानतळ मुंदडा यांच्या नावाने मत मागायचे तर आता स्वतःच्या सुनबाई नमिताताई मुंदडा ह्या विद्यमान आमदार आहेत त्यांच्यासाठी माझा सद्यस्थिती चाभार समाजाचे मतदान मागायला आता आपल्या समाजाचा उमेदवार निवडून द्या असं मतदारसंघांमध्ये मतदार बांधवांना नंदकिशोर मुंदडा हे विनंती करत आहेत परंतु मतदार राजा म्हणत आहे की मांग महार चांभार सह अन्य पोट जातीतील उमेदवार हवा आहे. परंतु हा घराणेशाही मुंदडा परिवाराची या २०२४ च्या निवडणुकीमध्ये हाणून पाडायचे आहे म्हणून यावेळी निमित्ताने मुदडाचा पराभव आटळ मानला जात आहे.तर चर्मकार समाजातील मतदार बंधू–भगिनींना नंदकिशोर मुंदडा हे हात जोडत असताना त्यांना आताशीक आपण सोयरे धायरी पाहुणेरावळे आहोत का असा प्रश्न यावेळी नंदकिशोर मुंदडाना मतदारसंघातील मागासवर्गीय समाजाची मतदार नेतेमंडळी विचारत आहेत त्यामुळे आता एससी






- मांग, महार, चांभार, ढोरसह इतर जातीचे नेतेमंडळीसह मतदार आ. नमिता मुंदडाला पाडण्याच्या तयारीत?
- स्व.विमलताई मुंदडाच्या नावानंतर आता सुनबाई आ. नमिताताई मुंदडाच्या एससी जातीचा निवडणुकीत फायदा नंदकिशोर मुंदडा घेऊ लागले?
- एससी जातीचा फायदा मुंदडा परिवाराला नंदू काका नव्हे तर आता नंदू दाजी मन्हां?
- मुंदडा परिवाराने एससी मागासवर्गीयांच्या जातीच्या प्रमाणपत्राचा पुरेपूर फायदा घेतला?
- दोन ते तीन हजार कोटीचा निधी गुत्तेदाराच्या घशात घालणाऱ्या मुंदडा परिवाराला आता जनता घरी बसवणार केज मतदार संघातील मतदारांमध्ये प्रचंड रोष?
- मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या नंदकिशोर मुंदडाला मराठा,दलित मुस्लिम समाज बांधव केज मतदार संघामध्ये आता मतदान करणार नाहीत. त्यामुळे आता नंदकिशोर मुंदडाच्या एससी, मराठा, दलित, मुस्लिम, हा मतदार राजा विरोधात गेल्यामुळे नंदकिशोर मुंदडाची कसोटी?
- नंदकिशोर मुंदडा स्व. विमलताई मुंदडा आ. नमिता मुंदडांच्या आडून मागासवर्गीय जातीचा लाभ आपल्या पदरात पाडून घेत आहेत. मुंदडा परिवारामध्ये किती दिवस सत्ता द्यायची केज मतदार संघात चर्चा रंगू लागल्या? आमदार नमिता मुंदडा यांचा पराभवाला नंदकिशोर मुंदडा जबाबदार राहणार?
- पत्नी आणि सुना च्या नावाने केज मतदार संघात मागासवर्गीय जातीचा फायदा घेणाऱ्या मुंदडा परिवाराला आता जनता धडा शिकवणार नंदकिशोर मुंदडा यांचा रेरावीपणा २०२४ च्या निवडणुकीमध्ये भोवणार?

राखीव असलेल्या मतदार संघावर नंदकिशोर मुंदडा यांना आता घरी बसवल्याशिवाय केज मतदार संघातील जनता शांत बसणार नाही असाही मतदारांनी नंदकिशोर मुंदडा यांच्या विनंतीला विरोध करत आता नंदकिशोर मुंदडा ना आता नंदू काका म्हणायचं नाही तर नंदू दाजी म्हणायचं का असा एका मतदाराने नंदू काकांना म्हणजेच सर्वांच्या नंदू दाजी अर्थात नंदकिशोर मुंदडा यांना म्हटले आहे. केज अबाजोगाई मतदार संघात हास्य चर्चा रंगू लागल्या आहेत.?

# बीडवासियांच्या झंजावाताचा शुभारंभ अनिलदादांनी फोडला प्रचाराचा नारळ!

## चारशे गाड्यांचा ताफा घेऊन हजारो कार्यकर्त्यांसह अनिलदादा जगताप बीड मतदार संघातील देवस्थानी नतमस्तक

## अनिलदादा जगताप, प्रा सुरेश नवलेंचे बीड मतदार संघात सर्वत्र जोरदार स्वागत



बीड । प्रतिनिधी

गेल्या चाळीस वर्षांच्या राजकीय प्रवासात निःस्वार्थपणे बीडवासियांची सेवा करत आलेले अनिलदादा जगताप हे केवळ बीड विधानसभेचे अपक्ष उमेदवार नसून अनिलदादा हा बीडवासियांचा झंजावत आहे आणि याच झंजावाताला प्रारंभ झाला असून अनिलदादा जगताप यांनी माजी राज्यमंत्री प्रा. सुरेशजी नवले आणि आपल्या हजारो सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्र परिवाराच्या चारशे गाड्यांचा ताफा घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करून वंदन केले व त्यानंतर नवगण राजुरी येथे गणपतीचे दर्शन घेऊन श्री क्षेत्र नारायण गड येथे श्री नगद नारायणाचे आशीर्वाद घेत त्यांच्या चरणी प्रचाराचा नारळ फोडला आणि आपल्या प्रचाराचा शुभारंभ केला. यानंतर बीड मतदार संघातील राजुरी सर्कल, लिंबागणेश सर्कल, पाली सर्कल, खोकरमोहा जि प, नळावंडी सर्कलमधील गावागावातील देवस्थानाचे दर्शन घेतले. दरम्यान गावाखेड्यातील प्रत्येकाने अनिलदादा आणि सुरेश नवले यांचे गावात आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी करत अनिलदादांना पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले तर माता–माऊली आणि भगिनींनी अनिलदादा यांचे औक्षण करून त्यांना पुढील वाटचालीसाठी आशीर्वाद दिले. यानंतर अनिलदादांनी गौरक्षनाथ टेकडी या देवस्थानी नतमस्तक होऊन महंत नवनाथ महाराजांचा आशीर्वाद घेतला. त्यानंतर बीड शहरातील भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर, बस्वेश्वर स्वामी, संत गाडगे बाबा महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, अहिल्यादेवी होळकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, महाराणा प्रताप, माता जिजाऊ यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून वंदन केले. याप्रसंगी अनिलदादा जगताप आणि प्रा सुरेशजी नवले यांनी ठिकठिकाणी उपस्थित असलेल्या आपल्या समर्थक कार्यकर्त्यांच्या, ग्रामस्थांच्या भेटी घेतल्या व विधानसभा निवडणुकीत आम्हाला मतदान रुपी आशीर्वाद द्या असे आवाहन केले.



### क्षीरसागर मुक्त बीड करून विकासाचा कायापालट करण्यासाठी साथ द्या–अनिलदादा जगताप

अनेक वर्ष सत्ता भोगून बीड विकासाचा खेळखंडोबा करणाऱ्या क्षीरसागरांपासून मला बीडची सुटका करायची आहे आणि बीड विकासाचा कायापालाट करायचा आहे. यासाठी माझ्यावर एकदा विश्वास ठेऊन मला साथ द्या. आपल्या अपेक्षेप्रमाणे मी बीडचा विकास करून दाखवेल. आपण मला मतदानरुपी आशीर्वाद दिला तर घरणेशाहीचे मक्तेदारी संपुष्टात येईल आणि सामान्य घरात सत्ता स्थापित होऊन सामान्यांचे मूलभूत प्रश्न सुटतील. असे आवाहन बीड विधानसभेचे अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांनी बीड मतदार संघातील जनतेला केले.

# नऊ तारखेला खा. शरद चंद्र पवार परळीत जाहीर सभेचे आयोजन-अँ. जीवनराव देशमुख

परळी । प्रतिनिधी

काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष शिवसेना महा विकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचार अर्थ शरद पवार यांची परळी येथे नऊ तारखेला जाहीर सभा होणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस परळी विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राज साहेब देशमुख यांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे सर्व शरद पवार हे बीड जिल्हा दौऱ्यावर असून परळी वैजनाथ येथे दिनांक नऊ नोव्हेंबर रोजी त्यांची जाहीर सभा होणार आहे माहिती सरकारच्या काळात सर्वसामान्य जनतेला बसलेल्या शाळा आणि महाराष्ट्राच्या हिताच्या बाबतीत स्पेशल अपयशी असलेल्या महायुती सरकारला धडा शिकवण्यासाठी या विधानसभा निवडणुकीत जनमत महाविकास आघाडीच्या बाजूने असून शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली येणाऱ्या काळ राज्यात महाविकास आघाडीचे



सरकार स्थापन होणार आहे. या दृष्टिकोनातून सर्व कार्यकर्ते ठिकठिकाणी जाहीर सभा घेत आहेत. त्याच अनुषंगाने परळी वैजनाथ येथे दिनांक नव रोजी शरद पवार यांच्या उपस्थितीत शाहीर सभा होणार आहे अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस माहिती दिली आहे तर परिसरातून व दलित मुस्लिम मराठा या मताची टक्केवारी जोडून मा. शरद चंद्रजी पवार साहेब यांनी परळी विधानसभेचे उमेदवार राज साहेब देशमुख. यांना उमेदवारी जाहीर केलेली आहे पण येथे सत्ताधारी पक्षाचे जिल्हा पालकमंत्री यांच्या विरोधात मराठा कार्ड वापरलेला आहे यासाठी प्रचार अर्थ शरद पवार यांची परळी येथे जाहीर सभा होणार आहे.

# ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या गाडीवर भ्याड हल्ला

## हल्लेखोरांनवर कठोर कारवाई करावी नसता आंदोलन करण्यात येईल : प्रियांकाताई खेडकर

चकलांबा । प्रतिनिधी

ओबीसी आरक्षणाच्या रक्षणासाठी आंदोलन लक्ष्मण हाकेयांच्या गाडी वर दगड फेकत प्राणघातक हल्ला करत मागच्या बाजूच्या काच फोडण्यातं आले . नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील बाचोटी इथे हा प्रकार घडल्याची माहिती आहे. बाचोटी येथून जात असताना काही जणांनी तोंड बांधून हल्ला केला.

.या घटनेचा जाहीर निषेध करून गेवराई विधानसभा मतदार संघातील वंचित बहुजन आघाडी चे उमेदवार प्रियांकाताई खेडकर



तसेच वंचित बहुजन आघाडी चे कार्यकर्ते यांनी गेवराई पोलीस स्टेशन ला निवेदन देण्यात आले. लक्ष्मण हाके व नवनाथ आबा वाघमारे यांच्या सुरक्षेत वाढ करावी. व हल्लेखोरावर कठोर कारवाई करूण गुन्हे दाखल करण्यात यावी नसता. संपूर्ण ओबीसी दलित, मुस्लिम समाज रस्त्यावर उतरून आंदोलन केले जाईल.यावेळी अजयकुमार गायकवाड, वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुका अध्यक्ष, गेवराई विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार प्रियांकाताई खेडकर , किशोर भोले ता महासचिव, सुभाण भाई जिल्हा सदस्य, गणेश बिडे,सुंदर मारकड, बलभीम बारगजे, ओबीसी बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

# आ.संदीप क्षीरसागरांच्या नेतृत्वाखाली पक्षप्रवेश मोमीनपुरा भागातील अनेक कार्यकर्ते राष्ट्रवादीत

बीड । प्रतिनिधी

ऐन निवडणुकीच्या काळात बीड मतदार संघात आ.संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) मध्ये, इतर पक्षाच्या कार्यकर्त्यांचे पक्षप्रवेश मोठ्या प्रमाणात होत आहेत. बुधवार (दि.६) रोजी बीड शहरातील मोमीनपुरा भागातील तसेच गुरूवारी (दि.७) रोजी नाळवंडी येथील अनेक कार्यकर्त्यांनी आ. क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) मध्ये प्रवेश केला.



बीड शहरातील मोमीनपुरा भागातील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाचे कार्यकर्ते असलेले ईशान मोमीन, आरसोलन मोमीन, मोशोरन मोमीन, रिजवान मोमीन, आवेझ मोमीन, शेख रिजवान, शेख नविद यांनी आपल्या समर्थकांसह बुधवार (दि.६) रोजी तसेच बीड तालुक्यातील नाळवंडी येथील ऋषी सोनवणे, जीवन राठोड, कृष्णा घोडके यांनीही आ. संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर व देशाचे नेते खा.शरदचंद्र पवार साहेब यांच्या पुरोगामी विचारांवर विश्वास ठेवून आ. संदीप क्षीरसागर यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात जाहीर प्रवेश केला.

# धनंजय मुंडेंच्या प्रचारार्थ परळी शहरात महायुतीच्या पदाधिकारी-कार्यकर्त्यांची प्रचार फेरी, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## धनंजय मुंडेंनी केलेली कामे व मदत लोक पदाधिकाऱ्यांना सांगू लागली

परळी । प्रतिनिधी

कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या सोबतीला आता परळी शहरातील महायुतीचे सर्वच पदाधिकारी व कार्यकर्ते प्रचारासाठी मैदानात उतरले असून आज सकाळच्या सात वाजल्यापासून दिवसभर माहितीच्या पदाधिकाऱ्यांनी परळी शहरातील विविध भागात घरोघर जाऊन नागरिकांच्या भेटी घेत धनंजय मुंडे यांना मतदान करण्याचे आवाहन केले. या प्रचार फेरीस उत्स्फूर्त असा प्रतिसाद परळीकर नागरिकांनी दिल्याचे पाहायला मिळाले.

धनंजय मुंडे यांनी आम्हाला कोविड काळात मदत केली, धनंजय मुंडे यांनी आम्हाला घरकुल दिले, धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून आम्हाला वैद्यकीय मदत मिळाली, आमच्या घरात पाणी घुसले तेव्हा सर्वात आधी धनंजय मुंडे आमच्या मदतीला धावून आले, आमच्या सण



उत्सवात, आमच्या सुख-दुःखात धनंजय मुंडे उपस्थित असतात, अशी अनेक कामे नागरिकच यावेळी पदाधिकाऱ्यांना सांगू लागले. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात परळी शहर विकासाच्या पथावर असून याची प्रचिती प्रत्यक्ष नागरिकांच्या तोंडून ऐकायला मिळत आहे. या प्रचार फेरीत सहभागी झालेल्या गुलाबी साडी परिधान केलेल्या महिला पदाधिकारी यांची संख्याही लक्षणीय होती.आज या प्रचार फेरीच्या माध्यमातून परळी शहरातील बाजीप्रभू नगर, पंचवटी नगर, स्नेहनगर, जगमित्र हाऊसिंग सोसायटी, स्वाभिमान नगर, औद्योगिक वसाहत, पॉवरलूम, शास्त्रीनगर, शिवाजीनगर, माणिक नगर, जिव्हेश्वर नगर, तसेच सायंकाळच्या सत्रात महर्षी कणाद विद्यालय परिसर, अरुणोदय मार्केट, गुरुकृपा नगर, स्वाती नगर, परमार कॉलनी, जयनगर या भागात डोअर टू डोअर प्रचार करण्यात आला. या प्रचार फेरीत राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपा, शिवसेना व मित्रपक्ष महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. शुक्रवारी सुद्धा ही प्रचार फेरी शहरातील उर्वरित भागात सुरू राहणार असल्याचे प्रचार समितीच्या वतीने कळवण्यात आले आहे.

# ओबीसी नेत्यांनी प्रस्थापितांचे जोडे उचलायचे बंद करा -शिवाजीराव काळे

किल्ले धारूर / प्रतिनिधी

लोकसभेच्या निवडणुकीच्या जखमा अजून ताज्या असतानाच काही ओबीसी नेते स्वतःच्या फायद्यासाठी प्रस्थापितांचे जोडी उचलत ओबीसी समाजाचा नेता असल्याचे दाखवत आहेत पण या वेळी ओबीसी बांधव एकत्रित आला असून आपला कोण परका कोण याची जाणीव समाज बांधवांना झाली असून मतदान रूपी ते दाखवून देतील असे प्रतिपादन सरपंच शिवाजीराव काळे यांनी केले असून पुढे बोलताना माधव निर्मळ यांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आव्हान त्यांनी केले.लोकसभेच्या निवडणुकीमध्ये ज्यांना देशाच्या राजकारणामध्ये काम करण्याची संधी आली होती देशाचं नेतृत्व मंत्री म्हणून करण्याची खूप नामी संधी आली होती यातून बीड जिल्ह्याचा न भूतो न भविष्य असा विकास झाला असता परंतु जातीय समीकरणे लावून काही प्रस्थापितांनी फक्त आपल्या मताची पोळी भरण्यासाठी ओबीसी उमेदवार म्हणून माननीय पंकजाताई चा पराभव केला ही जखम आयुष्यभर भरून येण्यासारखी नाही आता ओबीसी बांधव एक एकत्रित आहे त्यांना आपल्या लेकरा बाळांचे भवितव्याची चिंता आहे कोण आपला आहे याची जाणीव त्यांना झाली आहे. ओबीसी नेते म्हणून माधव निर्मळ फिरतात अशा वावड्या कुणी उठवू नये काही जण उठवत आहेत ज्या निर्मळ परिवारांनी २५ वर्ष राष्ट्रवादी पक्षाचे काम करताना कधी कुणाची जात बघितली नाही आता त्यांना जातीचा द्वेष देऊन बदनाम करण्याची षडयंत्र काहीजण करत आहेत परंतु ओबीसी समाजाचे हिताची जपणूक करणारे माधव निश्चित आहेत काही लोकांनी प्रस्थापितांचे जोडे उचलण्याचे काम करून उगाच ओबीसी समाजाचा नेता म्हणून फिरू नये आणि कुणाला बदनाम करण्याचे काम करू नये विद्यमान आमदाराच्या गावात त्यांना किती मतदान झाले जरा आकडे बघून आरोप करा मतदारसंघातील जनता सुज्ञ आहे यावेळी माधव निर्मळ यांचा विजय निश्चित आहे असे प्रतिपादन सरपंच शिवाजीराव काळे यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे केले.



# महाविकास आघाडीला धक्का ! रोहित फावडे देणार युवासेना शहरप्रमूख पदाचा राजीनामा

## सन्मानपूर्वक वागणूक मिळत नसल्याने हा निर्णय ; लवकरच सहकाऱ्यांना सोबत घेऊन योग्य नेता निवडणार ; रोहित फावडे

किल्ले धारूर । प्रतिनिधी

विधानसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याने इच्छुक उमेदवार डोअर टू डोअर प्रचार करताना दिसत आहेत येत्या वीस नोव्हेंबरला निवडणुक कार्यक्रम असल्याने विधानसभेचे वारे प्रचंड वाहू लागलेले आहेत मात्र माजलगाव मतदार संघात ऐनवेळी आघाडीत बिघाडी झाल्याने ठाकरे गटाचे युवासेना धारूर शहरप्रमुख रोहित मुकुंदराव फावडे हे आपल्या युवासेना शहरप्रमुख पदाचा राजीनामा देणार असल्याने आघाडीला निवडणुकीच्या तोंडावर मोठा धक्का बसणार आहे. युवा ताकतीचा कार्यकर्ता रोहित फावडे असल्याने धारूर तालुक्यात ही त्यांचा मोठा मित्र परिवार आहे त्यांच्या राजीनाम्याने महाविकस आघाडीला मोठा धक्काच बसणार असं बोललं जात आहे.

फावडे हे नेहमी सोशल मीडियात अग्रेसर असतात मीडिया मार्फत अनेक लोकांच्या जवळीक संपर्कातही असतात सामाजिक कार्यात प्रत्येक वेळी-वेळी सहभाग घेऊन अग्रेसर राहतात प्रत्येक क्षेत्राचा अनुभव असल्याने त्यांचा दांडगा संपर्क देखील आहे यावेळी पुढे बोलत असताना सांगत होते वेळोवेळी आम्ही महाविकास आघाडीच्या मित्रपक्ष या नात्याने महविकास आघाडीचे उमेदवार मोहन दादा जगताप त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिलोत परंतु धारूर शहरातले मित्र पक्षाचे स्थानिकचे पुढारी वारंवार युवासेना पदाधिकाऱ्यांना व युवा सैनिकांना सन्मानपूर्वक मान देत नसल्याने युवा सेना शहर प्रमुख पदाचा राजीनामा देणार असल्याचा फावडे यांनी सांगितलं.

मागच्या काही दिवसापूर्वी हि धारूर शहरात कार्यकर्ता मेळावा महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन दादा जगताप यांच्या बैठक पोस्टरवर शिवसेना,युवासेना पदाधिकाऱ्यांचे फोटोच नसल्याने माजलगाव मतदार संघात चांगलेच वातावरण तापले होते प्रचंड रोष शिवसैनिक युवा सैनिकांमध्ये मागच्या काही दिवसापूर्वी मीडियाच्या माध्यमातून दिसत होता त्याच मुद्द्याला धरून रोहित फावडे हे राजीनामा देणार देत आहेत का अशी ही जोरदार चर्चा होत आहे मात्र प्रसिद्ध पत्राद्वारे त्यांनी बोलताना शिवसेना ,युवासेना पदाधिकाऱ्यांना सन्मानाची वागणूक आघाडीत मिळत नसल्याने राजीनामाचा निर्णय घेत आहे असे सांगीतले.

तर लवकरच सहकाऱ्यांना सोबत घेऊन योग्य नेता निवडणार असून प्रवेश करणार असल्याचं रोहित फावडे यांनी सांगितलं सध्यातरी फावडे हे कोणत्या पक्षाचा झेंडा हाती घेऊन योग्य नेता कोणता निवडणार हे दिखील पाहणं तितकंच महत्त्वाचं आहे. त्यांच्या नवीन प्रवेश करणार असल्याच्या या शब्दाने कोणत्या नेत्याची अधिकची ताकद फावडे वाढणार याची जास्तच नागरिकांमध्ये चर्चा होऊ लागली आहे.

# २० हजार बेरोजगार युवकांच्या हाताला काम मिळेल असा रोजगार मी एमआयडीसीच्या माध्यमातून निर्माण करेल- महेबूब शेख

आष्टी /प्रतिनिधी

स्वातंत्र्य मिळाल्यापासून या तालुक्यातील आमदारांनी काहींनी चार तर काहींनी तीन दोन वेळा आमदारकीची टर्न मिळून देखील आजही आष्टी तालुक्याचा पाहिजे तेवढा विकास झाला नसून आजही आष्टी तालुका विकासापासून वंचित आहे तर आमदारांनी आपल्या पदाचा वापर हा हा स्वतःचा विकास करण्यासाठी केला आहे तसे त्याचा दुरुपयोग करून विविध विकास कामात अडथळा निर्माण केला आहे. आमदार हे लोकांच्या जीवनामध्ये योग्य तो बदल घडवण्याचा काम करतात तसेच एमआयडीसीच्या माध्यमातून लोकांना रोजगार निर्माण करण्यासाठी ते काम करतात मात्र या गेली ४० ते ५० वर्षात एमआयडीसीसाठी कुठल्याही लोकप्रतिनिधींनी यासाठी खास प्रयत्न केले नाही असे प्रतिपादन आष्टी,पाटोदा,शिरूर मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार महेबूब भाई शेख यांनी दौलावडगाव येथे केले.

पुढे बोलताना महेबुब शेख म्हणाले की जर मायबाप जनतेने माझ्यावर विश्वास टाकून मला सेवेची संधी दिली तर आष्टी पाटोदा शिरूर या तिन्ही पैकी कोणत्याही तालुक्यात योग्य ठिकाणी ज्या ठिकाणी जागा व पाण्याचा प्रश्न निर्माण होऊ नये अशी जागा निवडून त्या ठिकाणी एमआयडीसीचा भव्य प्रकल्प उभारून २०००० युवकांना एमआयडीसीच्या माध्यमातून रोजगार मिळवून देईल असे महेबूब शेख यांनी सांगितले.

आष्टी तालुक्यातील दौलवडगाव येथे महाविकास आघाडीचे तुतारीचे उमेदवार महेबूब भाई शेख यांनी जोरदार प्रचारामध्ये मुसंडी घेत विविध ठिकाणी गाव भेटी करून त्या ठिकाणी मतदारांशी भेटीगाठी घेऊन कॉर्नर सभा घेतल्या आहेत दौलवडगाव येथे देखील त्यांनी सभा घेऊन कार्यकर्त्यांना तसेच मतदारांना मार्गदर्शन करून आपणास संधी द्यावी असे आवाहन केले. पुढे बोलताना ते म्हणाले की आमदारकीच्या माध्यमातून आमदार हे कारखाना निर्माण करण्याचे काम करतात आणि शेतकऱ्याच्या ऊसाला तीन ते चार हजार रुपयांचे भाव देण्याचे काम ते करतात मात्र आपल्याकडील भागात कुठलाही कारखाना चालू नाही पश्चिम महाराष्ट्रात देखील हे चालू आहे मात्र आपल्या भागात पन्नास वर्षे आमदार राहुल नेमकं तुम्ही तालुक्यासाठी काय केलं आज इकडच्या शेतकऱ्यांना पश्चिम महाराष्ट्रात जाऊन तिकडच्या कारखान्याचे पाय धरावे लागतात शेतकऱ्यांच्या कापूस उसाला सोयाबीनला कसलाही भाव नाही याबाबत हे आमदार काहीच काम



करत नाही. आष्टी मतदार संघाचा विकास करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे व आष्टी,पाटोदा,शिरूर विधानसभा मतदारसंघाच्या प्रचार संवाद दौऱ्यावेळी आज दौलवडगाव या गावात ग्रामस्थांशी संवाद साधला.यावेळी महागाई, बेरोजगारी, ग्रामविकास, पाणी प्रश्न, रस्ते, या समस्यांवर सविस्तर चर्चा संपन्न झाली.आपल्या भागातील समस्यां सोडवण्यासाठी मी स्वतः कटिबद्ध आहे असा विश्वास ग्रामस्थांना दिला.आष्टी,पाटोदा, शिरूर मतदारसंघाच्या शाश्वत विकासासाठी येत्या २० नोव्हेंबर रोजी 'तुतारी वाजवणारा माणूस' या चिन्हासमोरील बटण दाबून प्रचंड बहुमताने निवडून द्या असे आवाहन त्यांनी केले.यावेळी भारतीय काँग्रेस तालुकाध्यक्ष रवि काका ढोबळे,परमेश्वर काका शेळके,सुनील दादा नाथ, विजय अण्णा गाढवे, संदीप खाडे,माऊली मुटकुळे, ईश्वर एकशिंगे, डॉ दत्ता इथापे,अविनाश दादा तळेकर,राहुल काकडे सरपंच,गणेश गुंजाळ,भास्कर घोरपडे,आदी उपस्थित होते. महेबुब भाई शेख यांना सध्या मतदारांच्या भेटीगाठीतून उस्फुर्त असा प्रतिसाद भेटत आहे.



# मनसेचा रेल्वे इंजिन धावणार

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघातून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार सोमेश्वर राजकुमार कदम यांनी डोर टू डोर गाटी भेटीवर जोर देत असल्याने येत्या निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा रेल्वे इंजिन नक्कीच जोरात धावणार आहे. असे की,सोमेश्वर राजकुमार कदम गेल्या अनेक वर्षापासून समाजकारण, राजकारण करीत असताना ज्या ज्या पदावर काम केले ते काम करीत असताना एकनिष्ठ व प्रामाणिकपणे केले आहे. या प्रसंगी समाजातील शेतकरी, शेतमजूर, माता-भगिनी, विद्यार्थी, वाहनधारक, ड्रायव्हर व समाजातील इतर घटक यांचे ज्या-ज्या प्रकारची कामे आली, उदा. टोलनाका, आर.टी.ओ. ऑफीस, पोलीस स्टेशन, एम.एस.ई.बी., जिल्हा परिषद यासारखी शासकीय व निमशासकीय, वैयक्तिक आरोग्य विषयक बील कमी करण्यासंदर्भात, अॅडमिशन संदर्भात, तसेच शेतकऱ्यांच्या बाबतीत ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, शेतकऱ्यांना पिक विमा मिळवुन देण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची धरणे आंदोलन, मोर्चे, रस्तारोको असे अनेक प्रकारचे अंदोलन उभा करून न्याय मिळवुन देण्याचे काम सोमेश्वर कदम यांनी केले आहे. तसेच कुठल्याही प्रकारची तक्रार किंवा अडचण सोडविण्यासाठी ते २४ तास ३६५ दिवस दिवासा व रात्री कधीही सर्वसामान्यांच्या सेवेत आजपर्यन्त उपलब्ध राहिलो आहे.सोमेश्वर कदम यांच्या प्रचारात डोअर टू डोअर वैयक्तिक घाटी भेटीवर जोर दिला असल्याने येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा रेल्वे इंजिन नक्कीच

# शहरातील अडिच कोटींचा रस्ता गुत्तेदाराच्या घशात घालणाऱ्या आमदाराला पुन्हा निवडून द्यायचे का ?- शेख मंजूर

माजलगाव (बातमीदार)

शहरातील मुख्य असलेल्या वैष्णवी मंगल कार्यालय ते जुनी हैदराबाद बँक दरम्यान झालेला दर्जाहीन रोड केवळ आमदार सोळंके यांनी गुत्तेदार पोसण्यासाठी केला असून अश्या कार्यक्षम आमदारांला पुन्हा निवडून द्यायचे का असा सवाल माजी नगराध्यक्ष तथा बहुजन वंचित आघाडीचे माजलगाव मतदारसंघाचे उमेदवार शेख मंजूर यानी केला आहे शेख मंजूर यांनी पत्रकारांशी वार्तालाभ करते वेळी येथील विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांच्या वर निशाना साधत त्यांच्या कार्यशैलीवर प्रश्न चिन्ह निर्माण केले आहे ते म्हणाले की शहरातील जुनी हैदराबाद बँक ते मा वैष्णवी मंगल कार्यालय रोड दरण्यान जो सिमेंट रस्ता झाला तो २ कोटी रुपये खर्चून झाला आहे. मात्र हा रस्ता लोकार्पण पूर्वीच खराब झाल्याने संमधीत गुत्तेदाराचे पितळ उघडे पडले मग झालेल्या बोगस रस्त्याची जबाबदारी कोणाची केवळ आपल्या मर्जीतील गुत्तेदार पोसण्यासाठी हा रस्ता झाला का ? या रस्त्यावरून जाताना लहान मुलं वृद्ध नागरिकांना नाक दाबून ये - जा करावी लागत आहे असं म्हणत शहरातील ज्या ठिकाणी रस्त्याची गरज आहे त्या ठिकाणी रस्ते का झाले नाही हा प्रश्न माझ्या सारख्या नागरिकाला पडतो

जी नगर पालिकेची भव्यदिव्य वस्तू आज उभी आहे जी मी मंजूर करून पूर्ण केली आणि श्रेय मात्र आमदार घेतात ! शहरातील जो राष्ट्रीय रस्ता झाला तो मोठा आणि नाल्या करू असं आश्वासन देऊन आणि व्यापारी यांचा याच कमी सत्कार घेऊन आज पाच वर्षे झाली कुठंय तो रस्ता !केवळ संमधीत विभागाकडे हँडवर्क झाला नाही असं सांगतात मग पाच वर्षात कुठली कामे केली ते समोर येऊन आ सोळंके यांनी सांगावे आशा या अ कार्यक्षम आमदाराला पुन्हा



निवडून द्यायचे का ? बाजाराचा प्रश्न आज ही कायम आहे असा सवाल बहुजन वंचित आघाडीचे अधिकृत शेख मंजूर भैया यांनी केला आहे

# टाटा सुमोच्या धडकेत सात वर्षांच्या मुलाचा मृत्यू

## गेवराई तालुक्यातील आहेर वाहेगाव येथील घटना

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील आहेर वाहेगाव येथे गुरुवारी सकाळी रस्ता ओलांडत असताना समोरुन येत असलेल्या टाटा सुमो ची जोराची धडक बसल्याने झालेल्या अपघातात सात वर्षीय मुलाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना गुरुवार दि.७ रोजी सकाळी घडली.

गेवराई स्टेडियम जवळ राहत असलेला श्रेयस शहादेव काळे हा दुसरी वर्गात शिकत असलेला विद्यार्थी दिवाळी सुट्टी निमित्त आजोळी आहेर वाहेगाव येथे गेला होता. गुरुवारी सकाळी तो रस्ता ओलांडत असताना पाचेगाव कडून येणाऱ्या टाटा सुमो ने धडक दिल्याने तो गंभीर जखमी झाला. त्याला गेवराई उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले होते. मात्र तत्पूर्वी त्याचे निधन झाले. त्याच्यावर पाडळशिंगी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



# केज मतदारसंघात एकच चर्चा..!

## विकासाच्या मुद्यावर आ. नमिता मुंदडा विजयी होणार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**केज मतदारसंघातील निवडणूक आता खऱ्या अर्थाने रंगात आली आहे. निवडणूक होत असली तरी केलेल्या विकासकामांची पावती केज मतदारसंघातील जनता भाजप महायुतीच्या उमेदवार सौ. नमिता अक्षय मुंदडा यांनाच देणार असल्याचे दिसून येत आहे. केज मतदारसंघात सध्या एकच चर्चा ऐकायला मिळत आहे ती म्हणजे विकासाच्या मुद्यावर नमिताताई मुंदडा या विजयी होणार व पुन्हा आमदार होणार.**

आ.नमिता मुंदडा या त्यांनी केलेल्या विकासकामांमुळे केज विधानसभा मतदारसंघातून प्रचंड मतांनी निवडून येतील असा विश्वास सर्वसामान्य जनतेला वाटू लागला आहे. मुंदडा कुटुंबाचे समर्थक सध्या आमदार ताई सोबत प्रचारात सक्रिय आहेत. त्यांना भरभरून प्रतिसाद मिळत आहे. भाजप महायुती, राष्ट्रवादी (अजित पवार गट) व शिवसेना (शिंदे गट) आणि मित्र पक्षाच्या केज विधानसभा मतदारसंघातील अधिकृत उमेदवार नमिता अक्षय मुंदडा यांच्याकडे केज मतदारसंघात विश्वासू कार्यकर्त्यांची मजबूत फळी व संघटन आहे. मागील पाच वर्षांत केज मतदारसंघात केलेल्या सातत्यपूर्ण भरीव विकास कामांमुळे आ. नमिता मुंदडा यांनी प्रचारात इतर उमेदवारांपेक्षा मोठ्या प्रमाणात आघाडी घेतली आहे. तसेच लोकप्रिय नेत्या आ. पंकजाताई मुंडे व माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांचे आशीर्वाद आणि भाजपचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा यांची खंबीर साथ आ.नमिता मुंदडा यांच्यासोबत असल्याने आ. मुंदडा यांचा विजय सुकर झाला आहे. असे वातावरण सर्वत्र निर्माण झाले आहे. अंबाजोगाई शहरातून प्रमुख पदाधिकारी व असंख्य कार्यकर्ते आ.नमिता मुंदडा यांना विजयी करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेऊन प्रयत्न करीत आहेत. आ.नमिताताई यांनी बुधवार, दिनांक ६ नोव्हेंबर रोजी केज मतदारसंघातील प्रचार दौऱ्याच्या निमित्ताने लाडेगाव, होळ, मुलेगाव, लाडेवडगाव, बावची (ता. केज) या गावांना भेट दिली व सर्वांशी थेट संवाद साधला. या प्रसंगी भारतीय जनता पक्ष आणि महायुतीचे सन्माननीय नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# दीपाताई क्षीरसागर गणेश वाघमारेच्या बैठकीला वार्डमध्ये मोठा प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

बीडचे महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी कॉर्नर बैठकांचा धडाका लावला आहे. त्यांना प्रत्येक प्रभाग व वार्डावार्डातून भरघोस प्रतिसाद मिळत आहे. या प्रचारादरम्यान त्यांनी काझी नगर, बाळराजे नगर, झमझम कॉलनी आदी परिसरात बैठका घेतल्या. डॉ.योगेश यांच्याकडे सकारात्मक कामाची दृष्टी आहे. त्यांनी कधीही गुंडगिरी किंवा गुंड प्रवृत्तीला थारा दिला नाही, असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी केले.

डॉ.दिपाताई क्षीरसागर म्हणाल्या, डॉ.योगेश हे उच्च विद्याविभूषित व्यक्तीमत्व असून त्यांच्याकडे विकासात्मक कामाची दृष्टी आहे. आजवर त्यांनी बीड



विधानसभेच्या कार्यक्षेत्रात अनेक कामे केली. त्यामध्ये मोफत आरोग्य शिबीरांचे आयोजन, युवकांसाठी बेरोजगार मेळावे, वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन, गणेशोत्सव, शिवजयंती, दसरा-दांडिया महोत्सवाचे आयोजन यांसारख्या सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन त्यांनी केले. नेहमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून ग्रामीण आणि शहरी भागात विकास कसा होईल याकडेच लक्ष दिले. विकास हीच जात आणि विकास हाच धर्म या स्व.काकुंच्या शिकवणीनुसार डॉ.योगेश यांची वाटचाल सुरू आहे. आजवर अध्यक्षसाहेबांनी बीडच्या विकासासाठी नगरपरिषदेच्या माध्यमातून काम केले. आता त्यांच्या कार्याची धुरा योगेश यांनी आपल्या खांद्यावर घेतली आहे. बीड विधानसभेच्या सर्वांगिण विकासासाठी आपल्याला डॉ.योगेश यांना विधानभवनात पाठवायचे आहे, असेही त्या म्हणाल्या. त्या महायुतीच्या योजनांविषयी सांगितले. लाडकी बहीण, मुलींना मोफत शिक्षण, महिलांना मोफत गॅस सिलिंडर, मोफत प्रवास, शेतकऱ्यांना कर्जमाफी अशा सर्वांगिण विकासासाठी महायुती कटिबद्ध आहे म्हणून या निवडणुकीत महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांना भरघोस मतांनी विजयी करा, असे आवाहन त्यांनी केले. या बैठकांना माजी नगरसेवक गणेश वाघमारे, शर्मा भाभी, काझी मुहम्मद साकीब, सोहेल, सय्यद झाकी, सादेक सिद्दिकी, हिना शेख, सय्यद फातेमा, झहिरा फातेमा, आशा वर्कर्स ग्रुप, धुतेकर, राजू, पुजारी आदींसह प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माध्यमिक विद्यालय टाकरवण शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा मोठ्या उत्साहात साजरा

टाकरवन । प्रतिनिधी

माध्यमिक विद्यालय टाकरवण येथील विद्यालयाचा सन १९९८ या शैक्षणिक वर्षातील माजी विद्यार्थ्यांनी तब्बल २६ वर्षा नंतर एकत्र येवुन विद्यार्थी व शिक्षक मेळाव्याचे आयोजन दि. ६ नोव्हेंबर २०२४ बुधवार रोजी माजलगांव येथील हॉटेल सुखसागर या ठिकाणी करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शिक्षक श्री. कोटुळे सर होते.कार्यक्रमाची सुरवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करुन करण्यात आली.या नंतर सर्व माजी विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी मिळुन सर्व शिक्षकांचा सत्कार करून फुलांचा वर्षाव करण्यात आला.

प्रत्येकजण आपली शाळा कशी आहे, हे डोळ्यांमध्ये साठवून घेत होता. वर्ग मित्र भेटल्याचा आनंद सर्वांच्याच चेहऱ्यावर दिसत होता. यात पुर्ण विद्यार्थी घडविणारी एक पिढी एकत्र आली होती. या वेळी बोलतांना कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.कोटुळे सर,व श्री. बि.के.मोरे सर,श्री.देशमुख सर,श्री.नाईकनवरे सर,श्री.के. व्ही. मोरे सर,श्री.दिपक राऊत सर,श्री.गरड सर,श्री.फपाळ सर,श्री.यादव सर,श्री.वायबसे सर,श्री.मोराळे सर या सर्व शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच शाळेतील मस्ती, एकत्रितपणे केलेला अभ्यास, शिक्षकांचा विद्यार्थ्यांवरील वचक, शाळेतील क्रीडा स्पर्धा,शिक्षकांनी दिलेली शिक्षा, स्नेहसंमेलन आणि त्यातील सांस्कृतिक कार्यक्रमाची धूम अशा विविध विषयांवर माजी विद्यार्थ्यांनी गप्पा करून जुन्या आठवणींना उजाळा दिला. या गप्पांच्या ओघात सर्वजण आपण इतके मोठे झालो हे विसरून गेले होते.आपआपल्या आठवणींना उजाळा देत एकमेकांसोबत मनसोक्त चर्चा ,गप्पागोष्टी केल्या.या कार्यक्रमात प्रत्येकांच्याआठवणींचा सागर अथांग वाहिला तसेच या कार्यक्रमाची आठवण म्हणुन सर्वांनी आभार प्रदर्शनानंतर सर्वांनी एकत्र स्नेहभोजनाचा व नंतर सार्वत्रिक ग्रुपचे फोटो सेशन करत



आनंद लुटला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुत्र संचालन गोविंद थोरात व बळीराम भुंबे यांनी केले. तर या कार्यक्रमाचे फोटो सेशन नामदेव तौर यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन रुस्तम बनसोडे व रविंद्र सुर्डिकर यांनी केले.

# डॉ सारिका ताई क्षीरसागरानी मतदारसंघ ढवळून काढला

महायुतीचे बीडचे उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी लिंबागणेश जिल्हा परिषद पिंजून काढले. त्यांच्या दौऱ्यास ठिकठिकाणी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.डॉ.योगेश क्षीरसागर यांनी प्रचारात मुसंडी मारली असून त्यांच्या प्रचारार्थ डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील मांजरसुंबा, गवारी, रत्नागिरी,

ससेवाडी, मोरगाव, दरडवाडा, खंडाळा, मुळूक, मसेवाडी, लिंबोनिष, अंजनवती, महाजनवाडी, पोखरी, पिंपळनेर, बेलगाव, सोमनाथवाडी, देवरेवाडी, सूर्याचीवाडी, भाळवणी, पिंपळवाडी, डोकेवाडा, वाळेकर वाडा,



कानेगाव, चराटा, धुमाळवाडी, मेंगडेवाडी, जाधववाडी, गवळवाडी, काळेवाडी, आहेर धानोरा, वरवटी यासह बहुतांश गावात दौरा केला. त्यांच्या दौऱ्यात

नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन केलेल्या कामांची माहिती दिली. नागरिकांनी उत्स्फूर्त स्वागत करून डॉ.योगेश क्षीरसागर यांना मोठे मताधिक्क्य देणार असल्याचा विश्वास दिला.

# केज मतदारसंघात एकच चर्चा..!

## विकासाच्या मुद्यावर आ. नमिता मुंदडा विजयी होणार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

केज मतदारसंघातील निवडणूक आता खऱ्या अर्थाने रंगात आली आहे. निवडणूक होत असली तरी केलेल्या विकासकामांची पावती केज मतदारसंघातील जनता भाजप महायुतीच्या उमेदवार सौ. नमिता अक्षय मुंदडा यांनाच देणार असल्याचे दिसून येत आहे. केज मतदारसंघात सध्या एकच चर्चा ऐकायला मिळत आहे ती म्हणजे विकासाच्या मुद्यावर नमिताताई मुंदडा या विजयी होणार व पुन्हा आमदार होणार.

आ.नमिता मुंदडा या त्यांनी केलेल्या विकासकामांमुळे केज विधानसभा मतदारसंघातून प्रचंड मतांनी निवडून येतील असा विश्वास सर्वसामान्य जनतेला वाटू लागला आहे. मुंदडा कुटुंबाचे समर्थक सध्या आमदार ताई सोबत प्रचारात सक्रिय आहेत. त्यांना भरभरून प्रतिसाद मिळत आहे. भाजप महायुती, राष्ट्रवादी (अजित पवार गट) व शिवसेना (शिंदे गट) आणि मित्र पक्षाच्या केज विधानसभा मतदारसंघातील अधिकृत उमेदवार नमिता अक्षय मुंदडा यांच्याकडे केज मतदारसंघात विश्वासू कार्यकर्त्यांची मजबूत फळी व संघटन आहे. मागील पाच वर्षांत केज मतदारसंघात केलेल्या सातत्यपूर्ण भरीव विकास कामांमुळे आ. नमिता मुंदडा यांनी प्रचारात इतर उमेदवारांपेक्षा मोठ्या प्रमाणात आघाडी घेतली आहे. तसेच लोकप्रिय नेत्या



आ. पंकजाताई मुंडे व माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांचे आशीर्वाद आणि भाजपचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा यांची खंबीर साथ आ.नमिता मुंदडा यांच्यासोबत असल्याने आ. मुंदडा यांचा विजय सुकर झाला आहे. असे वातावरण सर्वत्र निर्माण झाले आहे. अंबाजोगाई शहरातून प्रमुख पदाधिकारी व असंख्य कार्यकर्ते आ.नमिता मुंदडा यांना विजयी करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेऊन प्रयत्न करीत आहेत. आ.नमिताताई यांनी बुधवार, दिनांक ६ नोव्हेंबर रोजी केज मतदारसंघातील प्रचार दौऱ्याच्या निमित्ताने लाडेगाव, होळ, मुलेगाव, लाडेवडगाव, बावची (ता. केज) या गावांना भेट दिली व सर्वांशी थेट संवाद साधला. या प्रसंगी भारतीय जनता पक्ष आणि महायुतीचे सन्माननीय नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पूजाताई मोरे यांना शेतकरी आणि सर्वसामान्यांचा वाढता प्रतिसाद

## प्रस्थापितांना कंटाळलेली जनता आता नव्या पर्यायाच्या शोधात

बीड/प्रतिनिधी

प्रस्थापितांकडून होत असलेले तेच तेच राजकारण आणि एवढ्या वर्षात विकासच बघायला न मिळाल्याने वैतागलेले शेतकरी आणि सर्वसामान्य जनता यंदा गेवराई विधानसभेत परिवर्तन करण्याच्या तयारीत असून, नवा आणि फ्रेश चेहरा म्हणून शिवाय शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या कामाला नेहमीच पडणाऱ्या पूजाताई मोरे यांना मतदारांतून वाढता पाठिंबा मिळत आहे.

गेवराईचे राजकारण हे पंडित आणि पवार या करण्याभोवतीच फिरत आले आहे. या प्रस्थापित घराण्यांनी विकासाची खोटी आश्वासने देत आजवर लोकांच्या मतावर राज्य केले. प्रत्येक वेळी तेच तेच राजकारण आणि तेच तेच चेहरे बघून मतदार संघातील जनता वैतागली आहे. विशेष करून शेतकरी वर्ग आणि सर्वसामान्य या राजकारणाला आणि अविकसितपणाला कंटाळले असून, यंदा परिवर्तन घडवायचे असा संकल्प त्यांनी केल्याचे दिसत आहे. याचसाठी नवा पर्याय म्हणून पूजाताई मोरे यांच्याकडे बघितले जात आहे. शेतकरी आणि सर्वसामान्य जनता याबाबत खुलेआमपणे बोलू लागली आहे. यंदा परिवर्तन घडवायचेच आणि जे आपला प्रश्न उचलून धरतील त्यांना निवडून द्यायचे असा विचार मतदारांनी केला आहे. पूजाताई मोरे यांनी शेतकऱ्यांसाठी आजवर केलेले कार्य आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी उठविलेला



फडावर जात ऊसतोड कामगारांची घेतली भेट

आवाज जनतेला ठाऊक आहे. यामुळे त्यांच्या प्रचाराला सध्या प्रचंड मोठा प्रतिसाद मिळताना दिसतो आहे. शुक्रवारी पूजाताई मोरे यांनी मतदार संघातील टाकळ गव्हाण, शिर्डी बुद्रुक, बाबुलतारा, टाकरवन, तपेलिमगाव, दत्तबाग, रामनगर, शेलगाव, रिधोरी, कवडगाव, सुर्डी नजीक, राजेगाव आणि ठिकाणचा दौरा करीत मतदारांच्या भेटी घेतल्या. या सर्वच ठिकाणचे शेतकरी आणि सर्वसामान्यांनी पूजाताई मोरे यांना भरभरून पाठिंबा देताना, आम्हाला बदल घडवायचा असून आम्ही तुमच्याच सोबत आहोत असे आश्वासित केले.

दौऱ्या दरम्यान पूजाताई मोरे यांनी उस्फडात काम करीत असलेल्या ऊस कामगारांची भेट घेतली. ऊसतोड कामगारांच्या व्यथा आणि त्यांच्या समस्या यांची जाणीव पूजाताई मोरे यांना चांगल्या प्रकारे आहे. त्यांच्या हक्कासाठी सुद्धा त्यांनी यापूर्वी लढा दिलेला आहे. यावेळी ऊसतोड कामगारांनी पूजाताई मोरे यांचे कौतुकही केले. तुमच्या हक्कासाठी मी सदैव लढत राहणार असून, तुमच्या स्वास्थ्य जीवनासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे पूजाताई मोरे यांनी यावेळी सांगितले.

### पाटोदा व जामखेड हद्दीत डी.जे. साऊडचे साहित्य चोरी करणारी गँग स्थानिक गुन्हे शाखा,बीड ने उघड करुन

# तीन गुन्हे आणले उघडकीस आणुन सहा आरोपी केले निष्पन्न करुन एकुण १०,९५,०००/- डीजे साहित्याचा मुद्देमाल केला जप्त

मा.पोलीस अधीक्षक श्री. अविनाश बारगळ साहेब यांनी जिल्हयातील मालाविरुध्दचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा,बीड येथील पो.नि.श्री. उस्मान शेख यांना दिले आहे. त्याअनुषंगाने पो.नि. श्री. उस्मान शेख यांनी आपल्या अधिनस्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांना योग्य मार्गदर्शन केले आहे. फिर्यादी कल्याण संपत भाकरे , डी.जे.वाहन चालक रा.भाकरेवस्ती ता.पाटोदा यांचे वाहनाला लावलेले डी.जे. व साहित्य कोणीतरी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले होते.त्यावरुन पो.स्टे.पाटोदा येथे २९५/२०२४ कलम ३४१(१),३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये दिनांक २७/१०/२०२४ रोजी गुन्हयाची नोंद झाली होती.

दिनांक ०७/११/२०२४ रोजी सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना पो.नि. श्री.उस्मान शेख यांना गुप्त बातमी मिळाली की, दगडी शहाजानपुर येथील सुरेश नवनाथ गायकवाड व त्याचे साथीदारांनी मिळुन चोरीचे डीजे साहित्य आणलेले आहेत. या खात्रीशिर बातमीवरुन वरुन पुढील तपास करण्यासाठी पोउपनि श्रीराम खटावकर व त्यांचे पथकास पाचारण करण्यात आले . त्यानंतर स्थागुशा पथकाने बातमीतील इसमाचा शोध घेण्यास सुरुवात केली नमुद इसम हा सम्राट चौक येथे उभा असल्याची माहिती



मिळताच त्यास ताब्यात घेवुन नाव विचारले असता त्याने त्याचे नाव सुरेश नवनाथ गायकवाड वय २२ रा.दगडी शहाजानपुर असे सांगितले. पथकाने त्यास डी.जे. चोरीच्या अनुषंगाने बारकाईने विचारपुस केली तेव्हा त्याने त्याचे इतर पाच साथीदारांसह डी.जे. साहित्य चोरी केल्याचे सांगितले. त्याचे इतर साथीदार पैकी अंबादास उर्फ अमोल अंकुश गायकवाड रा.शहाजानपुर ता.जि.बीड हा शहाजानपुर येथुन ताब्यात घेण्यात आला.

दोन्ही आरोपीतांना अधिक विचारपुस केली असता त्यांनी आणखीन दोन ठिकाणी डीजे साहित्य चोरी केल्याची कबुली दिली. त्यावरुन १) पो.स्टे.पाटोदा गुरनं ३११/२०२४ कलम ३३४(१) बी.एन.एस. व पो.स्टे.जामखेड गुरनं ४७३/२०२४ कलम ३०५(ल) बी.एन.एस. असे दोन गुन्हे उघडकीस आलेले आहेत. स्था.गु.शा.पथकाने आरोपींकडुन त्यांचे ताब्यातील चोरीचे डी.जे. साहित्य एकुण १०,९५,०००/- रु चा मुद्देमाल जप्त केला असुन उर्वरित चार आरोपींचा शोध घेणे चालु आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. अविनाश बारगळ पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि श्री. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड, यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/मनोज वाघ,अशोक दुबाले, दिपक खांडेकर, सोमनाथ गायकवाड, बाळु सानप, अर्जुन यादव, नारायण कोरडे, अश्विनकुमार सुरवसे, असिफ शेख, चालक सिद्धार्ष मांजरे यांनी मिळुन केली आहे.

# जम्मू-काश्मीर विधानसभेत कलम ३७० वरुन तुफान राडा

### सत्ताधारी आणि विरोधक आमदार एकमेकांना भिडले

जम्मू-काश्मीर (प्रतिनिधी)

जम्मू-काश्मीरमध्ये ओमर अब्दुल्ला सरकार सत्तेत आले आहे. कलम ३७० वरून निवडणुकीतच वातावरण तापले होते. या मुद्दावर गेल्या दोन दिवसांपासून मोठा वाद सुरू आहे. आज या धुसफुसीचे रुपांतर धक्काबुक्की आणि हाणामारीपर्यंत गेलं आहे. विरोधक आणि सत्ताधारी आमने-सामने आले. कलम ३७० वरून धुमश्चक्री उडाली. हे कलम परत घेण्यासाठी वाद उफाळून आला आहे. दोन्ही गटातील आमदार आज एकमेकांना भिडले.

आज जम्मू आणि काश्मीर विधानसभेत तुफान राडा झाला. आमदारांमध्ये कलम ३७० वर झटापट झाली. यावेळी कलम ३७० रद्द करण्याची मागणी करणारे पोस्टर फाडण्यात आले. विधानसभेचे कामकाज या गोंधळामुळे २० मिनिटांसाठी स्थगित करण्यात आले होते. मात्र, दोन्ही बाजुचे आमदारांची आक्रमकता पाहता आज विधानसभेच्या कामकाजाला



जोरदार फटका बसण्याची शक्यता आहे. सकाळी सकाळीच विधानसभेत मोठा हंगामा झाला. त्यानंतर दोन्ही गटाचे आमदार आमने-सामने आल्याने वातावरण तणावपूर्ण झाले. घोषणाबाजीने सभागृह चांगलंच दणाणून गेले.

कलम ३७० वरून मोठा गदारोळ

आज सकाळीच आमदार शेख खुर्शीद कलम ३७० पुन्हा बहाल करण्यात यावे अशी मागणी करणारे पोस्टर घेऊन सभागृहात आले. हे पोस्टर पाहताच भाजप आमदार भडकले. त्यावेळी त्यांनी हे पोस्टर हिसकवण्याचा आणि फाडण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये दोन्ही गटामध्ये झटापट झाली. भाजप आमदारांनी शेख खुर्शीद यांच्या हातातून पोस्टर हिसकावलेच आणि ते फाडले सुद्धा. एकमेकांची कॉलर पकडून बॅनर हिसकावून घेण्यास दोन्ही बाजूंनी सुरुवात केली. गोंधळ वाढत असल्याचे पाहून मध्यस्थी करणाऱ्या मार्शलनी भाजप आमदारांना सभागृहाच्या बाहेर काढले.

# आमदार प्रकाश सोळंके यांच्या माजलगावात प्रचार फेरीला प्रचंड प्रतिसाद

**माजलगाव (प्रतिनिधी)**

**महायुतीचे उमेदवार आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या प्रचारार्थ माजलगावात प्रचार फेरीचा आज शुभारंभ करण्यात आला या प्रचारफेरीला शेहरवासीयांनी प्रचंड प्रतिसाद दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी भाजप शिवसेना आरपीआय आझाद क्रांती सेना अमोल शेरकर मित्र मंडळ लहुजी क्रांती सेना या महायुतीचे उमेदवार आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या प्रचार फेरीचा दि. ७ नोव्हेंबर रोजी सकाळी नऊ वाजता मंगलनाथ मंदिरात भाजपाचे ज्येष्ठ नेते डॉ. प्रकाशराव आनंदगावकर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला**



ही प्रचार फेरी शहरातील प्रभाग एक मधील छत्रपती नगर मंगलनाथ कॉलनी विवेकानगर मध्ये काढण्यात आली या प्रचार फेरीला शेरवासीयांनी प्रचंड प्रतिसाद दिला या प्रचार फेरीमध्ये सौ मंगलाताई सोळंके यांच्या नेतृत्वाखाली एक प्रचार फेरी काढण्यात आली तर डॉक्टर प्रकाश राव आनंदगावकर यांच्या उपस्थितीमध्ये काढण्यात आलेल्या प्रचार फेरीमध्ये शिवसेनेचे समन्वयक नितीन मुंदडा तालुकाप्रमुख तुकाराम येवले शहर प्रमुख धनंजय सोळंके युवा सेनेचे तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते अच्युतराव लाटे संपादक शिवाजी रांजण माजी नगराध्यक्ष नासेर खान पठाण माजी नगरसेवक खालील पटेल नवाब पटेल सभापती संभाजीराव शेजुळ प्रताप रांजवन, नगरसेवक राहुल लंगडे विजय शिंदे नारायण माने अंबादास चव्हाण शरद सोळंके माजी नगरसेवक कमलाकर कुरे सुशांत पौळ डॉ.अशोक देशपांडे शरद भांडेकर सुनील रुद्रवार नागोराव चव्हाण यांच्यासह तरुण कार्यकर्ते

# टपाली मत पत्रिकेचा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी घेतला आढावा

मानवत (प्रतिनिधी)

पाथरी विधानसभा मतदार संघातील टपाली मतपत्रिका कामाचा आज निवडणूक निर्णय अधिकारी यांनी घेतला आढावा पाथरी विधानसभा मतदारसंघातील कर्तव्यावर उपस्थित राहणाऱ्या मतदान कर्मचारी यांना मतदानाचा हक्क बजावता यावा म्हणून पाथरी विधानसभा मतदारसंघातील निवडणूक कार्यावर कार्यरत कर्मचारी व इतर विधानसभा मतदार संघात जिल्ह्यात किंवा पर जिल्ह्यात निवडणूक कामासाठी कार्यरत असलेले परंतु पाथरी मतदारसंघात मतदार यादीत नाव असलेल्या कर्मचारी ज्यानी फॉर्म नंबर १२ भरून टपाली मतदान करण्याची मागणी करून टपाली मतपत्रिका त्यांना उपलब्ध करून देणे व पाथरी मतदार संघातील ४०% पेक्षा जास्त दिव्यांग असलेल्या व ८५ वय पेक्षा जास्त वय असलेल्या मतदारांना ज्यांनी बीएलओ



मार्फत घरबसल्या मतदान करण्यासाठी होकार फॉर्म भरून दिलेले आहेत त्या सर्वांची संख्या निश्चित करणे त्या नुसार टपाली मतपत्रिका प्राप्त करून घेणे त्याची सुरक्षा व गोपनीयता ठेवणे त्यासोबत विहित फॉर्म भरून घेण्याची कामे निवडणुकीतील टपाली मतपत्रिका कक्षामध्ये चालू असून या कामाचा आढावा श्री शैलेश लाहोटी निवडणूक निर्णय अधिकारी पाथरी यांनी घेतला व कर्मचाऱ्यांना कामाबाबत आवश्यक त्या सूचना केल्या यावेळी टपाली मतपत्रिका कक्षाचे प्रमुख श्री सुनील कावरखे तहसीलदार सोनपेठ तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्री चंदेल नायब तहसीलदार सोनपेठ उपस्थित होते.

# आ.संदीप क्षीरसागरांच्या नेतृत्वाखाली पक्षप्रवेश

### मोमीनपुरा भागातील अनेक कार्यकर्ते राष्ट्रवादीत

बीड (प्रतिनिधी)

ऐन निवडणुकीच्या काळात बीड मतदार संघात आ.संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) मध्ये, इतर पक्षाच्या कार्यकर्त्यांचे पक्षप्रवेश मोठ्या प्रमाणात होत आहेत. बुधवार (दि.६) रोजी बीड शहरातील मोमीनपुरा भागातील तसेच गुरूवारी (दि.७) रोजी नाळवंडी येथील अनेक कार्यकर्त्यांनी आ.क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) मध्ये प्रवेश केला.



बीड शहरातील मोमीनपुरा भागातील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाचे कार्यकर्ते असलेले ईशान मोमीन, आरसोलन मोमीन, मोशोरन मोमीन, रिजवान मोमीन, आवेज मोमीन, शेख रिजवान, शेख नविद यांनी आपल्या समर्थकांसह बुधवार (दि.६) रोजी तसेच बीड तालुक्यातील नाळवंडी येथील ऋषी सोनवणे, जीवन राठोड, कृष्णा घोडके यांनीही आ. संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर व देशाचे नेते खा.शरदचंद्र पवार साहेब यांच्या पुरोगामी विचारांवर विश्वास ठेवून आ. संदीप क्षीरसागर यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात जाहीर प्रवेश केला.

# महाराष्ट्रासह झारखंडमध्ये पैशांचा पाऊस आणि दारुचा महापूर!

नवी दिल्ली (प्रतिनिधी)

महाराष्ट्र आणि झारखंडमधील निवडणुका तसेच पोटनिवडणुकांमध्ये मतदारांना प्रलोभन देण्याची प्रकरणे रोखण्याच्या उद्देशाने निवडणूक आयोगाच्या अखत्यारीतील यंत्रणांनी केलेल्या कारवाईत आत्तापर्यंत ५५८ कोटी रुपये मूल्यांची रोकड, मोफत वाटपासाठी आणलेल्या प्रलोभनपर वस्तू, मद्य, अंमली पदार्थ आणि मौल्यवान धातू जप्त केले आहेत. निवडणुका जाहीर झाल्यापासून केवळ महाराष्ट्र राज्यात केलेल्या कारवाई अंतर्गत सुमारे २८० कोटी रुपये मूल्याचा माल जप्त केला गेला आहे. तर झारखंडमधूनही आतापर्यंत आणखी १५८ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

महाराष्ट्रात ७३.११ कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे, तर ३७.९८ कोटी रुपयांची दारू आणि ३७.७६ कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले आहेत. निवडणूक आयोगाने ९०.५३ कोटी रुपयांचे मौल्यवान धातू आणि ४२.५५ कोटी रुपयांच्या मोफत वस्तू जप्त केल्या आहेत.झारखंडमध्ये १०.४६ कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. ७.१५ कोटी रुपयांची दारू आणि ८.९९ कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आलं आहे. निवडणूक आयोगाने ४.२२ कोटी रुपयांचे मौल्यवान धातू आणि १२७.८८ कोटी रुपयांच्या मोफत वस्तू जप्त केल्या आहेत.

# ऍड.प्रकाश आंबेडकर यांच्या सभेस हजारोच्या उपस्थित रहा-शेख मंजूर

माजलगाव । प्रतिनिधी

दलित,वंचित,मुस्लिम,गोरगरीब मराठा,बहुजन यांचा बुलंद आवाज आवाज असणारे एडवोकेट बाळासाहेब(प्रकाश)आंबेडकर यांची जाहीर सभा रविवार दि.१० रोजी दुपारी एक वाजता जुना मोंढा मैदान माजलगाव येथे आयोजित करण्यात आली आहे.या एल्गार सभेस हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार शेख मंजूर यांनी केले आहे.

वंचित बहुजन आघाडीचे नेते ऍड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या (जोशोबा महासंकल्प)जाहीर सभेस विविध मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. माजलगाव नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष शेख मंजूर हे वंचित बहुजन आघाडी कडून माजलगाव विधानसभेचे उमेदवार आहेत.पक्ष प्रवेश केल्यानंतर अल्पावधीत त्यांनी मतदारसंघात पक्षाचे विचार दलित,मुस्लिम,गोरगरीब मराठा, बहुजन समाजापर्यंत नेण्याचे काम केले आहे.निवडणुकीच्या रणधुमाळीत पक्षाचे वातावरण निर्माण केले आहे.दरम्यान मतदार संघात बहुरंगी लढत होत आहे.या लढतीत प्रकाश आंबेडकर यांच्या रविवार दि.१० रोजी होणाऱ्या जाहीर(जोशोबा महासंकल्प सभेने) वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.त्यामुळे या जाहीर सभेत हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार शेख मंजूर यांनी केले आहे.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT